खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## मा. अश्विनी कोळेकर यांचा सन्मान



अश्विनी कोळेकर यांचा सत्कार करताना संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील.

### अश्विनी कोळेकरचे 'यूपीएससी'त यश

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यातील धामणे गावची सुकन्या आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी अश्विनी अरुण कोळेकर हिने केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेतलेल्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल अश्विनी कोळेकरचा पालकांसह खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, प्रमोद गाणू, सुरेश टाकळकर, बाळासाहेब लिंभोरे, नितीन गोरे, राजेंद्र टाकळकर, अरुण कोळेकर, जनता कोळेकर, अक्षय कोळेकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे उपस्थित होते. अश्विनी कोळेकर यांनी आई-वडिलांचा विश्वास सार्थ ठरवताना त्यांच्या संस्कारावर मार्गक्रमण केल्याचे सांगितले. साहेबराव बुट्टे पाटील यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालय सुरू केल्यामुळे ग्रामीण भागातल्या मुली शिक्षण घेऊ शकल्याबद्दल त्यांनी ऋण व्यक्त केले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध करण्यासाठी कठोर मेहनत घ्यावी, असेही त्या म्हणाल्या. सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी केले. प्रा. विठ्ठल दौंडकर यांनी आभार मानले.

Pune Gramin Edition
Mar 11, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

# ‘युपीएससी’च्या परीक्षेत अश्विनी काळेकर हिचे यश

राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी अश्विनी अरुण कोळेकर या नुकत्याच केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे (युपीएससी) घेण्यात आलेल्या परीक्षेत ६७५ व्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन उल्लेखनीय यश संपादन केले.

या यशाबद्दल कोळेकर यांचा सत्कार खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळातर्फे करण्यात आला. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, प्रमोद गाणू, सुरेश टाकळकर, बाळासाहेब लिंभोरे, नितीन गोरे, राजेंद्र टाकळकर तसेच अरुण कोळेकर, जनता कोळेकर, अक्षय कोळेकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे उपस्थित होते.

अश्विनी कोळेकर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन संस्थेच्या वतीने कौतुक करण्यात आले. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी अश्विनी कोळेकर यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. अश्विनी यांचा सत्कार म्हणजे कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीचा गौरव असल्याचे त्यांनी सांगितले. अश्विनी यांनी आपल्या अधिकारपदाच्या कारकीर्दीत सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले. तालुक्यातील होतकरू आणि गुणवंत विद्यार्थ्यांसाठी त्यांचे यश प्रेरणादायी असून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे सर्वतोपरी मदत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले. अश्विनी कोळेकर यांनी संस्थेने केलेल्या सत्काराबद्दल ऋण व्यक्त करताना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा प्रवास कथन केला. आई-वडिलांचा विश्वास सार्थ ठरवताना त्यांच्या संस्कारावर मार्गक्रमण केल्याचे त्यांनी सांगितले. साहेबराव बुट्टेपाटील यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालय सुरू केल्यामुळे आमच्यासारख्या ग्रामीण भागातल्या मुली शिक्षण घेऊ शकल्याबद्दल त्यांनी त्यांचे ऋण व्यक्त केले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध करण्यासाठी कठोर मेहनत घ्यावी; यश नक्की मिळेल असेही त्या म्हणाल्या. या कार्यक्रमात अश्विनी यांच्या आईवडिलांचाही संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी तर, आभार प्रा. विठ्ठल दौंडकर यांनी मानले.



**राजगुरुनगर : अश्विनी काळेकर यांचा सत्कार करताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील व इतर मान्यवर.**

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख